# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 10/01/2023 (मंगळवार) दुपार

---

### विनयभंग करणाऱ्या आरोपीला अटक

**पो.स्टे. उमरेड** :— अंतर्गत ०६ किमी. अंतरावर मौजा नवेगाव साधु येथे दिनांक ०८/०१/२०२३ चे १८.३० वा. दरम्यान यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी/पिडीता वय १५ वर्ष व आरोपी नामे— आदित्य रामकृष्ण कुंभरे, वय २३ वर्ष, रा. नवेगाव साधु, ता. उमरेड जि. नागपुर हे एकाच गावातील रहीवासी असुन फिर्यादी ही आपल्या रोजमजुरीच्या कामाला गेली असता फिर्यादीची मुलगी ही एकटीच घरी हजर असता आरोपी आदित्य कुंभरे हा घरी आला व फिर्यादी च्या मुलीला म्हणु लागला की ''तु माझ्या सोबत चाल'' व फिर्यादी ची मुलगी पिडीता वय १५ वर्ष हीने आरोपी याला नकार दिल्याने आरोपी याने फिर्यादीच्या मुलीचा विनयभंग करून तिच्या गालावर तिनचार थापडा मारल्या व घराच्या बाहेर हात पकडुन बाहेर आणले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन उमरेड येथे आरोपीविरूद्ध कलम ४५२, ३५४, ३२३, ५०४, ५०६ भादंवी, सहकलम ८, १२ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक पोलीस निरीक्षक शितल खोब्रागडे मो. क्र. ८३०८०८२०९४ या करीत आहे.

### पळवून नेवुन विनयभंग करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. खापरखेडा** — दिनांक ३१/१२/२०२२ चे १२.४० वा. चे सुमारास पो.स्टे. खापरखेडा हद्दीत फिर्यादी मुलगी वय २४ वर्षीय हीला आरोपी नामे— सुग्रीव यादव रा. सिताबर्डी नागपुर शहर याने फोन करून फिर्यादीस बोलावुन सांगितले की ''मला तुझा वाढदिवस साजरा करायचा आहे. तु मला एकटी भेट'' असे म्हणुन फिर्यादी ही आरोपीस भेटण्या करीता बाजार लाईन, चनकापुर कॉलनी येथे गेली असता फिर्यादीला जबरदस्ती बाईकवर बसवुन घेवुन गेला असता बाईक वरून पाडुन देण्याची धमकी देवुन फिर्यादीशी अश्लिल शब्दात बोलुन फिर्यादीचा विनयभंग केला व शिवीगाळ केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सिताबर्डी नागपुर शहर येथे दाखल घेवुन सदरचा गुन्हा पो. स्टे. खापरखेडा येथे वर्ग झाल्याने तपासात घेतला. पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३६३, ३५४, ५०४ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक कापगाते पो.स्टे. खापरखेडा मो. नं. ९८६००९४०२९ या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर